# Political Science
## Paper III
# राज्यशास्त्र
## प्रश्नपत्रिका III

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

**Note :** This Paper contains Seventy Five (75) multiple choice questions, each question carrying Two (2) marks. Attempt *All* questions.

**सूचना :** या प्रश्नपत्रिकेत एकूण **पचहत्तर** (75) बहुपर्यायी प्रश्न दिलेले आहेत. प्रत्येक प्रश्नाला **दोन** (2) गुण आहेत. **सर्व** प्रश्न सोडवा.

1. Give *correct* answer by using the code given below :

Assertion (A) : The behaviourists generally avoided the use of historical materials in their study.

Reason (R) : They avoided the study of history because its emphasis on uniqueness of events could lead to historicism.

*Codes* :

(A) Both (A) and (R) are correct and (R) is the answer of (A)

(B) Both (A) and (R) are correct but (R) is not the answer of (A)

(C) (A) is correct, (R) is false

(D) (A) is false, (R) is correct

1. खाली दिलेल्या संकेतसूचीचा वापर करून योग्य उत्तर द्या :

**विधान** (A) : आपल्या अभ्यासात वर्तन वाद्यांनी ऐतिहासिक साधनांचा वापर टाकला आहे.

**कारण** (R) : ह्यांनी इतिहासाचा अभ्यास टाळता कारण त्यांना असे वाटले की इतिहासकारांनी घटनांच्या एकमेवत्त्वावर भर दिल्या मुळे त्यांची इतिहासवादाकडे वाटचाल होईल.

**संकेतसूची :**

(A) दोन्ही (A) व (R) बरोबर आहेत व (R) हे (A) चे उत्तर आहे

(B) दोन्ही (A) व (R) बरोबर आहेत पण (R) हे (A) चे उत्तर नाही

(C) (A) बरोबर आहे, (R) चूक आहे

(D) (A) चूक आहे, (R) बरोबर आहे

2. Who among the following declared that Political Theory is dead ?
   (A) Harold Lasswell
   (B) David Easton
   (C) P. Lasslett
   (D) W. Runciman

3. Give the *correct* answer by using the code given below :
   (1) The liberals rejected the principle of natural rights.
   (2) The liberals have radically individualistic view of community.
   (3) They found the standard of judgement outside society and in theory of natural law.

   *Codes* :
   (A) (1), (2) and (3) are correct
   (B) (1) and (2) are correct, (3) is wrong
   (C) (1) is correct, (2) and (3) are wrong
   (D) (1) and (2) are wrong, (3) is correct

2. खालीलपैकी कोणत्या विचारवंताने राजकीय सिद्धांत मृत झाले आहेत असे म्हटले ?
   (A) हैरॉल्ड लासवेल
   (B) डेव्हिड ईस्टन
   (C) पी. लासलेट
   (D) डब्ल्यू. रुन्सीमन

3. खालील दिलेल्या संकेतसूचीचा वापर करून योग्य उत्तर द्या :
   (1) नैसर्गिक अधिकारांच्या सिद्धांतास उदारमतवाद्यांनी नकार दिला.
   (2) उदारमतवाद्यांचा समुदायाबाबतचा प्रागतिक व्यक्तिवादी दृष्टिकोण होता.
   (3) त्यांनी निर्णयाचे मानक समाजाच्या बाहेर व नैसर्गिक कायद्यात प्रतिष्ठित केले.

   **संकेतसूची :**
   (A) (1), (2) व (3) बरोबर आहेत
   (B) (1) व (2) बरोबर आहेत, (3) चूक आहे
   (C) (1) बरोबर आहे, (2) व (3) चूक आहे
   (D) (1) व (2) चूक आहे, (3) बरोबर आहे

4. Which one of the following is *not* a Marxist concept ?

(A) Dialectical and historical materialism

(B) Theory of surplus value

(C) Theory of Alienation

(D) The Real is Rational

5. Which one of the following statements is *not* correct ?

(A) According to Mill, Individual has a right to develop his individuality as a part of well being.

(B) Individual can suffer constructive injury in the pursuit of truth.

(C) Individual may gamble at home but he has no right to run gambling house.

(D) Irrespective of its outcome, the rights of individual are unlimited.

4. खालीलपैकी कोणता सिद्धांत मार्क्सवादी **नाही** ?

(A) द्वंद्वात्मक व ऐतिहासिक भौतिकवाद

(B) अतिरिक्त मूल्याचा सिद्धांत

(C) परात्मभावाचा सिद्धांत

(D) जे वास्तविक आहे ते विवेकनिष्ठ आहे

5. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?

(A) मिलच्या मते व्यक्तीला सार्वजनिक हितासाठी आपल्या व्यक्तित्वाचा विकास करण्याचा हक्क आहे.

(B) सत्याच्या शोधासाठी व्यक्ती सकारात्मक इजा सोसू शकते.

(C) व्यक्ती आपल्या घरात जुगार खेळू शकते पण त्यास जुगाराचा अड्डा सुरू करण्याचा हक्क नाही.

(D) त्याच्या परिणामांचा विचार न करता व्यक्तीचे अधिकार अमर्याद आहेत.

6. Which one of the following pairs is *not* correctly matched ?

(A) Plato — Justice means to be true to your nature.

(B) Mozes — Justice means helping the friends and harming enemies.

(C) J. Rawls — Justice means fairness.

(D) E. Barker — Justice means fitting together the claims of individuals.

7. Which one of the following thinkers said that ideology was false consciousness ?

(A) Hegel

(B) Marx

(C) Kant

(D) Bentham

6. खालीलपैकी कोणती जोडी योग्य प्रकारे जुळवली **नाही** ?

(A) प्लेटो – न्याय म्हणजे आपल्या स्वभावाप्रती इमान राखणे.

(B) मोझेस – न्याय म्हणजे मित्रांना मदत करणे व शत्रूस इजा करणे.

(C) जे. रॉल्स – न्याय म्हणजे रास्तपणा.

(D) ई. बार्कर – न्याय म्हणजे व्यक्तीच्या अधिकारांना योग्य प्रकारे स्थापित करणे.

7. खालीलपैकी कोणत्या विचारवंताने विचार-सरणीस मिथ्या जाणीव म्हटले आहे ?

(A) हेगेल

(B) मार्क्स

(C) कांट

(D) बेंथॅम

8. Which one of the following arguments was refuted by Lenin in his book 'State and Revolution' ?
   (A) Karl Kautsky —
   The state is an instrument in the hands of ruling classes.
   (B) Kropotkin —
   Withering away of the state immediately after the revolution.
   (C) Stalin —
   Socialism in one country.
   (D) L. Trotski —
   Permanent Revolution.

9. Which one of the following statements is *not* correct ?
   Mao Tse Tung criticised the Soviet model of development as he thought that it encouraged :
   (A) Difference between mental and physical labour
   (B) Gap between Urban and Rural areas
   (C) Gap between Industry and Agriculture
   (D) Gap between Party and Government

8. खालीलपैकी कोणत्या विचारांचे लेनिनने आपल्या 'स्टेट एण्ड रिवोल्युशन' (शासनसंस्था व क्रांती) या पुस्तकात खंडन केले आहे ?
   (A) कार्ल कौटस्की —
   राज्यसंस्था सत्ताधारी वर्गाच्या हातातील साधन आहे.
   (B) क्रोपोटकिन —
   क्रांतीनंतर लगेच राज्यसंस्थेचा विलय झाला पाहिजे.
   (C) स्टैलिन — एका देशात समाजवाद.
   (D) एल्. ट्रॉटस्की — कायमस्वरूपी क्रांती.

9. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?
   माओ त्से तुंगने सोवियत संघाच्या विकास प्रतिमानावर टीका करताना म्हटले की त्यामुळे :
   (A) मानसिक व शारीरिक श्रमामध्ये भेद निर्माण होतो
   (B) शहरी व ग्रामीण भागात अंतर निर्माण होतो
   (C) उद्योग व शेती यात अंतर निर्माण होतो
   (D) पक्ष आणि सरकार यांत अंतर निर्माण होतो

10. Which one of the following books by Plato describes Socrates's trial and punishment ?

(A) The Republic

(B) The Apology

(C) The Laws

(D) The Statesman

11. In which form of the state, according to Aristotle, the principle of golden mean is introduced ?

(A) Monarchy

(B) Oligarchy

(C) Polity

(D) Democracy

10. खालीलपैकी कोणत्या पुस्तकात प्लेटोने सॉक्रेटिसवरचा म्हटला व त्यास झालेली सजा याचे वर्णन केले आहे ?

(A) दि रिपब्लिक

(B) दि ॲपॉलॉजी

(C) दि लॉज

(D) दि स्टेट्समन

11. ॲरिस्टॉटलच्या मते कोणत्या राज्य प्रकारात सुवर्णमध्याचे तत्व अंमलात आणले आहे ?

(A) राजेशाही

(B) अल्पजनशाही

(C) पॉलिटी

(D) लोकशाही

12. Which one of the following statements is *not* correct ?
    - (A) Machiavelli gave birth to new political science as he followed historical method.
    - (B) Machiavelli wanted his prince to build new state which was efficient.
    - (C) For Machiavelli the interest of the prince was inferior to reason of state.
    - (D) In discourses Machiavelli justified the immoral politics of the prince.

13. Who said it : "I authorise and give up my right of governing myself to this man or this assembly of men, on this condition that thou give up the right to him, and authorise all his actions in like manner" ?
    - (A) John Locke
    - (B) J.J. Rousseau
    - (C) Thrasymachus
    - (D) None of the above

12. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?
    - (A) मॅकीव्हलीने ऐतिहासिक पद्धतीचा वापर करून नव्या राज्यशास्त्रास जन्म दिला.
    - (B) राजाने कार्यक्षम अशी नवी राज्यसंस्था निर्माण करावी अशी मॅकीव्हलीची इच्छा होती.
    - (C) मॅकीव्हलीसाठी राजाचे हित हे राज्याच्या हितापेक्षा कमी महत्वाचे होते.
    - (D) 'डिसकोर्सेस' या ग्रंथात मॅकीव्हलीने राजाच्या अनैतिक राजकारणाचे समर्थन केले आहे.

13. "मी माझा माझ्यावर राज्य करण्याचा अधिकार व्यक्तीस वा व्यक्तींच्या सभागृहास या अटीवर सुपूर्द करीत आहे की त्याने सुद्धा या पद्धतीने आपल्या अधिकारांचा त्याग केला पाहिजे." असे कोण म्हणाले ?
    - (A) जॉन लॉक
    - (B) जे.जे. रूसो
    - (C) थ्रॅसीमॅकस
    - (D) वरीलपैकी कोणीही नाही

14. Who said it, "Equality must not be understood to mean that power and riches should be equally divided between all; but that power should never be so strong as to be capable of acts of violence and no one should be sufficiently opulent to be able to purchase another" ?

(A) J.S. Mill

(B) John Locke

(C) J.J. Rousseau

(D) Saint Simon

15. Which one of the following statements is *not* correct ?

Gandhi's theory of the oceanic circle means :

(A) A system of centre-periphery relationship.

(B) An independent, autonomous and centralised system of government.

(C) A non-pyramidal system of co-existing autonomous and self-governing villages.

(D) A mechanism to regulate national life with, if need be, violent means.

14. "समता म्हणजे सत्ता व संपत्ती यांचे सर्वात समान पद्धतीने विभाजन करणे नव्हे. सत्ता कधीही इतकी प्रबळ असू नये की ज्यामुळे ती व्यक्ती हिंसक कृती करील, वा कोणीही इतका संपन्न असू नये की तो इतरां विकत घेऊ शकेल." असे कोण म्हणाले ?

(A) जे.एस. मिल

(B) जॉन लॉक

(C) जे.जे. रूसो

(D) सेंट सायमन

15. खालीलपैकी कोणते विधान बरोबर **नाही** ?

म. गांधींचा महासागरीय वर्तुळांचा सिद्धांत म्हणजे :

(A) केंद्र-परिघि संबंधांची व्यवस्था.

(B) स्वतंत्र, स्वायत्त पण केंद्रीकृत शासन व्यवस्था.

(C) स्वायत्त व स्वशासित ग्रामांचे सहअस्तित्त्व असणारी सोपानविरहित व्यवस्था.

(D) राष्ट्रीय जीवनास हिंसक साधनांच्या द्वारा गरज पडल्यास नियमित करणारी यंत्रणा.

16. The behavioural approach to the study of comparative politics emphasises :
    - (A) Purely historical and legalistic analysis of politics
    - (B) Normative dimension of politics
    - (C) Methods of introspection and subjective deductions
    - (D) Scientific and empirical methods to study politics

17. In Marxist perspective on Constitutionalism the role of Constitution is to :
    - (A) Limit the authority of the state
    - (B) Protect the natural rights of the individual
    - (C) Reflect the existing socio-economic conditions of the society in terms of relations of production
    - (D) Decentralise the power of the state to the maximum possible level

16. तौलनिक राज्यशास्त्राच्या अध्ययनातील वर्तनवादी दृष्टिकोन खालीलपैकी कोणत्या बाबीवर विशेष भर देतो ?
    - (A) राजकारणाचे निव्वळ ऐतिहासिक व वैधानिक विश्लेषण
    - (B) राजकारणाचे मूल्यात्मक परिमाण
    - (C) व्यक्तिनिष्ठ अनुमान आणि आत्म-परिक्षणाच्या पद्धती
    - (D) राजकारण अभ्यासण्याच्या वैज्ञानिक व अनुभवगम्य पद्धती

17. घटनावादाबाबतच्या मार्क्सवादी परिप्रेक्ष्यानुसार राज्यघटनेचे कार्य हे :
    - (A) राज्यसंस्थेचे अधिकार मर्यादितकरणे हे आहे
    - (B) व्यक्तीच्या नैसर्गिक हक्कांचे रक्षणकरणे हे आहे
    - (C) विवक्षित आर्थिक आणि सामाजिक परिस्थितीतून उद्‌भवणाऱ्या उत्पादन संबंधांना प्रतिबिंबित करण्याचे आहे.
    - (D) राज्य-संस्थेच्या सत्तेचे अधिकाधिक विकेंद्रीकरण करण्याचे आहे

18. Which of the following is *not* a source of the British Constitution ?

(A) Statutory Law

(B) Common Law

(C) Judicial Decisions

(D) Roman Law

19. Match List 'A' with List 'B' and select the *correct* answer from the code given below :

List 'A'

(1) Russia

(2) Japan

(3) Germany

(4) France

List 'B'

(*a*) Senate

(*b*) Bundesrat

(*c*) House of Councillors

(*d*) Federation of Council

*Codes* :

(A) (1)-(*a*), (2)-(*b*), (3)-(*c*), (4)-(*d*)

(B) (1)-(*b*), (2)-(*c*), (3)-(*d*), (4)-(*a*)

(C) (1)-(*c*), (2)-(*d*), (3)-(*a*), (4)-(*b*)

(D) (1)-(*d*), (2)-(*c*), (3)-(*b*), (4)-(*a*)

18. खालीलपैकी कोणता स्रोत हा ब्रिटिश घटनेचा स्रोत म्हणून सांगता येणार **नाही** ?

(A) स्टॅट्युटरी लॉ

(B) कॉमन लॉ

(C) न्यायालयीन निवाडे

(D) रोमन लॉ

19. सूची 'अ' आणि सूची 'ब' च्या योग्य जोड्या जुळवा आणि खालील संकेत सूचीतील **अचूक** उत्तर निवडा :

**सूची 'अ'**

(1) रशिया

(2) जापान

(3) जर्मनी

(4) फ्रान्स

**सूची 'ब'**

(*a*) सीनेट

(*b*) बुन्डसरेट

(*c*) हाउस ऑफ काउंसिलर्स

(*d*) फेडरेशन ऑफ काउंसिल

*Codes* :

(A) (1)-(*a*), (2)-(*b*), (3)-(*c*), (4)-(*d*)

(B) (1)-(*b*), (2)-(*c*), (3)-(*d*), (4)-(*a*)

(C) (1)-(*c*), (2)-(*d*), (3)-(*a*), (4)-(*b*)

(D) (1)-(*d*), (2)-(*c*), (3)-(*b*), (4)-(*a*)

20. Which one of the following recommendations was made by C.M. Stephen Sub-committee with regard to reforms in parliamentary procedures ?
    (A) Transferring first reading of certain bills to committees
    (B) Reducing parliamentary sittings by one-third
    (C) Increasing right to amend a bill to its mover
    (D) None of the above

21. Which one of the following countries is an example of having Federal Constitution and Federal Government ?
    (A) India
    (B) Canada
    (C) USA
    (D) Brazil

20. सी.एम्. स्टिफन उप-समितीने केलेल्या शिफारसीपैकी खालीलपैकी कोणती शिफारस ही संसदीय कार्यपद्धतीतील सुधारणेविषयीची होती ?
    (A) काही विधेयकाचे प्रथम वाचन समित्यांकडे सोपवणे
    (B) संसदीय समित्यांच्या बैठकांची संख्या 1/3 पर्यंत कमी करणे
    (C) विधेयक सादर करणाऱ्या सभासदाचा दुरुस्ती विषयीचा अधिकार वाढवणे
    (D) वरीलपैकी एकही नाही

21. खालीलपैकी कोणते देश हे संघराज्यात्मकही आहेत आणि त्यांच्या राज्यघटनाही संघराज्यीय आहेत ?
    (A) भारत
    (B) कॅनडा
    (C) यु.एस्.ए.
    (D) ब्राझिल

22. Match the List I with List II and select the *correct* answer from the code given below :

List I

(*i*) Federation under dual or multiple monarchies.

(*ii*) Federation under legislative unions.

(*iii*) Federation under dual empires.

(*iv*) Federation under decentralized unitary system.

List II

(1) No guarantee of autonomy as it is revocable.

(2) Hapsburg rulers of Austria and Hungary.

(3) Constituent parts are united only in the person of a sovereign.

(4) Case of England and Scotland in 1707.

*Codes* :

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (3) | (1) | (4) |
| (B) | (3) | (4) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (4) | (3) |
| (D) | (4) | (1) | (3) | (2) |

22. सूची I आणि सूची II च्या योग्य त्या जोड्या जुळवून खालील संकेतसूचीतील अचूक उत्तरे निवडा :

**सूची** I

(*i*) दोन किंवा दोनापेक्षा अधिक राजेशाहीच्या अधिपत्या खालील संघराज्य.

(*ii*) वैधानिक संघाच्या अधिपत्या खालील संघराज्य.

(*iii*) दोन सम्राटांच्या अधिपत्याखालील संघराज्य.

(*iv*) विकेंद्रित एकात्म व्यवस्थेच्या अधिपत्या खालील संघराज्य.

**सूची** II

(1) स्वायत्ततेची कुढलीच हमी नाही कारण ते कधीही संपुष्टात आणले जाऊ शकते.

(2) ऑस्ट्रिया आणि हंगेरीतील हॅप्सबर्ग सत्ताधारी.

(3) सार्वभौम व्यक्तीच्या अधिपत्याखाली घटक क्षेत्रांचे एकीकरण.

(4) 1707 मधील इंग्लंड व स्कॉटलंडचे उदाहरण.

**संकेतसूची :**

| | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (2) | (3) | (1) | (4) |
| (B) | (3) | (4) | (2) | (1) |
| (C) | (1) | (2) | (4) | (3) |
| (D) | (4) | (1) | (3) | (2) |

23. In which one of the following decades the bi-election in UK mattered in consequential way ?

(A) 1970s

(B) 1980s

(C) 1990s

(D) None of the above

23. खालीलपैकी कोणत्या दशकामध्ये इंग्लंड-मधील उप-निवडणुका विलक्षण महत्त्वाच्या ठरल्या ?

(A) 1970 चे दशक

(B) 1980 चे दशक

(C) 1990 चे दशक

(D) वरीलपैकी कोणतेच नाही

24. Who among the following has classified political parties as clientele parties, ethnic parties, religious parties and class-based parties :

(A) Jean Blondel

(B) Maurice Duverger

(C) M. Ostrogorski

(D) R. Michels

24. खालीलपैकी कोणत्या अभ्यासकाने राजकीय पक्षाचे वर्गीकरण हे 'क्लायंटेल पक्ष', वांशिक पक्ष, धार्मिक पक्ष आणि 'वर्गाधारित पक्ष', असे केले आहे ?

(A) ज्यों ब्लाँदेल

(B) मॉरिस डुवर्जर

(C) एम. ऑस्ट्रोगॉर्स्की

(D) आर. मिचेल्स

25. The three political philosophers who laid the foundation for the theory of separation of powers were :
   (A) Aristotle, Bodin, John Locke
   (B) Aristotle, St. Augustine, Thomas Hobbes
   (C) Plato, Machiavelli, John Locke
   (D) Plato, Bodin, Machiavelli

26. Political socialisation is primarily :
   (A) Extractive function of political system
   (B) Conversion function of political system
   (C) Symbolic function of political system
   (D) System maintenance and adaptation function of political system

25. सत्ताविभाजनाच्या सिद्धांताचा ज्या तीन तत्त्वज्ञांनी पाया घातला ते खालीलपैकी कोण आहेत ?
   (A) ॲरिस्टॉटल, बोदँ, जॉन लॉक
   (B) ॲरिस्टॉटल, सेंट ऑगस्तिन, थॉमस हॉब्ज
   (C) प्लेटो, मॅकिएव्हली, जॉन लॉक
   (D) प्लेटो, बोदँ, मॅकिएव्हली

26. राजकीय सामाजिकीकरण हे राजकीय व्यवस्थेचे :
   (A) उत्पादक कार्य आहे
   (B) रूपांतर कार्य आहे
   (C) प्रतिकात्मक कार्य आहे
   (D) व्यवस्था निर्वाहाचे आणि पोषणाचे कार्य आहे

27. The major contribution to the development discourse by the proponents of dependency theory has been :

(A) Enriching the Agrarian model of development

(B) Rectifying the capitalist model of development

(C) Justifying the ecological model of development

(D) Explaining the process of 'Underdevelopment'

28. Who among the following elitist theorists emphasised the psychological traits of the elite as the source of its influence ?

(A) Mosca

(B) Burnham

(C) C. Wright Mills

(D) Pareto

27. 'परावलंबित्व सिद्धांतांच्या' प्रवर्तकांनी विकासविषयक चर्चा विश्वास केलेले महत्त्वाचे योगदान म्हणजे :

(A) त्यांनी कृषी विकासाचे समाजवादी प्रारूप समृद्ध केले

(B) त्यांनी भांडवली विकासाचे प्रारूप दुरुस्त केले

(C) त्यांनी पर्यावरणीय विकासाच्या प्रारूपाचे उत्तम समर्थन दिले

(D) त्यांनी निम्नविकासाची प्रक्रिया ताकदीने स्पष्ट करून सांगितली

28. खालीलपैकी कोणत्याही अभिजनवादी सिद्धांतकाने अभिजनांच्या प्रभावाचा स्रोत म्हणून वैशिष्टपूर्ण मानसिक गुणधर्माचा निर्देश केला आहे ?

(A) मोस्का

(B) बर्नहॅम

(C) सी. राईट मिल्स

(D) परेटो

29. A developing society would have to pass through four stages to become a modern society. Arrange the following stages chronologically :

(A) (*i*) Industrialisation
(*ii*) Political unification
(*iii*) National welfare
(*iv*) Abundance

(B) (*i*) Political unification
(*ii*) Industrialisation
(*iii*) National welfare
(*iv*) Abundance

(C) (*i*) National welfare
(*ii*) Political unification
(*iii*) Industrialisation
(*iv*) Abundance

(D) (*i*) National welfare
(*ii*) Industrialisation
(*iii*) Political unification
(*iv*) Abundance

29. विकसनशील समाजाला आधुनिक समाजाच्या अवस्थेपर्यंत पोचण्यासाठी चार अवस्थांतून जावे लागते. खाली दिलेल्या चार अवस्था क्रमशः लावला :

(A) (*i*) औद्योगिकीकरण
(*ii*) राजकीय एकीकरण
(*iii*) राष्ट्रीय कल्याण
(*iv*) समृद्धी

(B) (*i*) राजकीय एकीकरण
(*ii*) औद्योगिकीकरण
(*iii*) राष्ट्रीय कल्याण
(*iv*) समृद्धी

(C) (*i*) राष्ट्रीय कल्याण
(*ii*) राजकीय एकीकरण
(*iii*) औद्योगिकीकरण
(*iv*) समृद्धी

(D) (*i*) राष्ट्रीय कल्याण
(*ii*) औद्योगिकीकरण
(*iii*) राजकीय एकीकरण
(*iv*) समृद्धी

30. Which among the following books is considered to be the first systematic presentation of group-approach to the study of comparative politics ?

    (A) The Political System

    (B) The Nerves of Government

    (C) The Process of Government

    (D) The Governmental Process

31. How was the Constituent Assembly to be composed under Cabinet Mission Plan ?

    (A) Indirectly elected by the system of proportional representation from provincial legislatures.

    (B) Directly elected members by the people of India.

    (C) Nominated members by the provincial legislatures.

    (D) Elected by restricted and select franchise.

30. खालीलपैकी कोणत्या ग्रंथात तौलनिक राज्यशास्त्राच्या अध्ययन पद्धतीतील गट सिद्धांताची प्रथमच पद्धतशीर मांडणी करण्यात आली आहे ?

    (A) दि पोलिटिकल सिस्टम

    (B) दि नर्वस ऑफ गव्हर्नमेंट

    (C) दि प्रोसेस ऑफ गव्हर्नमेंट

    (D) दि गव्हर्नमेंटल प्रोसेस

31. कॅबिनेट मिशन योजनेने घटना समितीची रचना कशा प्रकारे सुचविली होती ?

    (A) प्रांतिक विधिमंडळाद्वारे प्रमाणशीर प्रतिनिधत्वाच्या आधारे अप्रत्यक्ष निवडणूक

    (B) भारताच्या जनतेमधून प्रत्यक्ष निवडणूक

    (C) प्रांतिक विधिमंडळांद्वारे नेमणूक

    (D) मर्यादित मताधिकारावर आधारित निवडणूक

32. Who among the following was the Chairman of the Committee on Minorities Rights in the Constituent Assembly ?

(A) N. Gopalswamy Iyyengar

(B) Sardar Patel

(C) K.M. Munshi

(D) B.R. Ambedkar

33. Which one of the following was concerned with the industrial development of India after independence ?

(A) Cabinet Mission Plan

(B) Bombay Plan

(C) Mountbatten Plan

(D) Karachi Charter

32. घटनासमितीच्या अल्पसंख्याकांच्या अधिकार समितीचे अध्यक्ष खालीलपैकी कोण होते ?

(A) एन. गोपालस्वामी आयंगार

(B) सरदार पटेल

(C) के.एम. मुन्शी

(D) बी.आर. आंबेडकर

33. स्वातंत्र्योत्तर भारतातील औद्योगिक विकासाशी खालीलपैकी कोणत्या योजनेचा संबंध होता ?

(A) कॅबिनेट मिशन योजना

(B) बॉम्बे प्लॅन

(C) माऊंटबॅटन योजना

(D) कराची चार्टर

34. When was the Constitutional Amendment to add the provision of Fundamental Duties made ?

(A) After Chinese war in 1962

(B) After war with Pakistan in 1965

(C) After India-Pakistan war in 1971

(D) During national emergency in 1976

35. Who among the following said : "If any government ignores Directive Principles of State Policy, they will have to answer for them before the electorate at the election time." ?

(A) Sardar Patel

(B) Maulana Azad

(C) B.R. Ambedkar

(D) Jawaharlal Nehru

34. मूलभूत कर्तव्ये घटनेत अंतर्भूत करणारी घटनादुरुस्ती कधी केली गेली ?

(A) 1962 च्या चीन युद्धानंतर

(B) 1965 च्या पाकिस्तान युद्धानंतर

(C) 1971 च्या भारत-पाकिस्तान युद्धानंतर

(D) 1976 च्या राष्ट्रीय आणीबाणी दरम्यान

35. "जर एखाद्या सरकारने मार्गदर्शक तत्त्वांकडे दुर्लक्ष केले, तर त्यांना निवडणूकीच्या वेळी मतदारांना पुढे याचा जाब द्यावा लागेल." असे खालीलपैकी कोण म्हणाले ?

(A) सरदार पटेल

(B) मौलाना आझाद

(C) बी.आर. आंबेडकर

(D) जवाहरलाल नेहरू

36. Which one of the following is provided in Indian Constitution vide Part V, Chapter 1, Articles 52-78 ?

(A) The Union Executive

(B) The Union Legislature

(C) The Judiciary

(D) Fundamental Rights

37. The matters of currency, banking, duties and income taxation belong to which one of the following Lists in Indian Constitution ?

(A) Concurrent List

(B) Union List

(C) State List

(D) None of the above

36. भारतीय राज्यघटनेच्या भाग 5, प्रकरण 1, कलमे 52 ते 78 यांमध्ये खालीलपैकी कशाविषयीच्या तरतुदी समाविष्ट केल्या आहेत ?

(A) केंद्रीय कार्यकारी मंडळ

(B) केंद्रीय विधिमंडळ

(C) न्यायपालिका

(D) मूलभूत अधिकार

37. चलन, बँकिंग, आयात कर आणि उत्पन्न कर या बाबी भारतीय राज्यघटनेतील खालीलपैकी कोणत्या यादीत समाविष्ट केल्या आहेत ?

(A) समवर्ती सूची

(B) केंद्र सूची

(C) राज्य सूची

(D) वरीलपैकी कोणतेच नाही

38. Which one of the following books was the first to be published on state politics in India ?

(A) Iqbal Narain — *State Politics in India*

(B) Lawrence Saez — *Federalism Without a Centre*

(C) Myron Weiner — *State Politics in India*

(D) Rajni Kothari — *Politics in India*

39. Which one of the following movements was launched in Maharashtra ?

(A) Chipko Movement

(B) Silent Valley Movement

(C) Fisher Folk's Movement

(D) Dalit Panther Movement

38. भारतातील राज्यांच्या राजकारणावरील खालीलपैकी कोणता ग्रंथ सर्वात आधी प्रकाशित झाला होता ?

(A) इक्बाल नारायण – **स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया**

(B) लॉरेन्स सेझ – **फेडरलिझम विदाऊट अ सेंटर**

(C) मायरन वायनर – **स्टेट पॉलिटिक्स इन इंडिया**

(D) रजनी कोठारी – **पॉलिटिक्स इन इंडिया**

39. खालीलपैकी कोणत्या चळवळीची सुरुवात महाराष्ट्रात झाली ?

(A) चिपको चळवळ

(B) सायलेंट व्हॅली चळवळ

(C) मच्छिमारांची चळवळ

(D) दलित पँथर चळवळ

40. Which one of the group of the following states are free from the politics of coalition ?

(A) Gujarat, Rajasthan, M.P.

(B) W. Bengal, U.P., Kerala

(C) Karnataka, Tamil Nadu, Jharkhand

(D) Punjab, Gujarat, Andhra Pradesh

41. Which one of the following is *not* included in Indian Constitution ?

(A) Planning Commission

(B) Finance Commission

(C) Election Commission

(D) None of the above

42. Which one of the following political parties had made a secessionist demand ?

(A) TDP

(B) Telangana Rashtra Samiti

(C) Indian Muslim League

(D) DMK

40. राज्यांच्या खालीलपैकी कोणत्या गटात आघाडीचे राजकारण अस्तित्वात **नाही** ?

(A) गुजराथ, राजस्थान, मध्यप्रदेश

(B) पश्चिम बंगाल, उत्तर प्रदेश, केरळ

(C) कर्नाटक, तामिळनाडू, झारखंड

(D) पंजाब, गुजराथ, आंध्र प्रदेश

41. भारतीय राज्यघटनेत खालीलपैकी कोणत्या बार्बीचा समावेश केलेला **नाही** ?

(A) नियोजन आयोग

(B) वित्त आयोग

(C) निवडणूक आयोग

(D) वरीलपैकी कोणतेही नाही

42. खालीलपैकी कोणत्या राजकीय पक्षाने पूर्वी फुटुन जाण्याची मागणी केली होती ?

(A) तेलगूदेशम पक्ष

(B) तेलंगण राष्ट्र समिती

(C) भारतीय मुस्लिम लीग

(D) द्रविड मुन्नेत्र कळहम (डी.एम.के.)

43. Which one of the following groups of states was *not* a participant of Srinagar Conclave in 1980s ?

(A) Punjab, Haryana, Himachal Pradesh, U.P.

(B) J&K, Tamil Nadu, Andhra Pradesh, West Bengal

(C) Assam, Karnataka, Maharashtra, Kerala

(D) Rajasthan, M.P., Orissa, Sikkim

44. Assertion (A) : The Kesavanand Bharati Case addressed important issues in Parliamentary democratic governance.

Reason (R) : The verdict put limits on the power of the Parliament to amend the Constitution.

*Codes* :

(A) Both (A) and (R) are true but (R) is not correct explanation of (A)

(B) Both (A) and (R) are true and (R) is correct explanation of (A)

(C) (A) is true but (R) is false

(D) (A) is false but (R) is true

43. 1980 च्या दशकात श्रीनगर कॉन्क्लेवमधे खालीलपैकी कोणता एक गट सहभागी झाला **नव्हता** ?

(A) पंजाब, हरियाणा, हिमाचल प्रदेश, उत्तर प्रदेश

(B) जम्मू-काश्मिर, तामिळनाडू, आंध्र प्रदेश, पश्चिम बंगाल

(C) आसाम, कर्नाटक, महाराष्ट्र, केरळ

(D) राजस्थान, मध्य प्रदेश, ओरिसा, सिक्किम

44. **विधान** (A) : संसदीय लोकशाही शासन व्यवहारातील अनेक महत्त्वाचे प्रश्न केशवानंद भारती खटल्याने संबोधित केले.

**कारण** (R) : त्यासंबंधीच्या निवाड्याने संसदेच्या घटनादुरुस्ती करण्याच्या अधिकारावर मर्यादा घातल्या.

**संकेतसूची** :

(A) विधान (A) आणि कारण (R) दोन्ही खरे आहे पण कारण (R) हे (A) विधानाचे अचूक स्पष्टीकरण नव्हे

(B) विधान (A) आणि कारण (R) दोन्ही खरे आहे आणि कारण (R) हे (A) विधानाचे अचूक स्पष्टीकरण आहे

(C) विधान (A) खरे आहे पण कारण (R) चूक आहे

(D) विधान (A) चुकीचे आहे पण कारण (R) खरे आहे

45. New Public Management underlined the importance of :
    (A) Corporate State
    (B) Interventionist State
    (C) Welfare State
    (D) Socialist State

46. According to Woodrow Wilson, the study of Public Administration is concerned with :
    (A) Complementarity of Politics and Administration
    (B) Dichotomy between Politics and Administration
    (C) Superiority of Politics over Administration
    (D) Subordination of Politics to Administration

45. नव-लोकव्यवस्थापनाने पुढीलपैकी एक अधोरेखित केले :
    (A) उपक्रमशील राज्य
    (B) हस्तक्षेपप्रधान राज्य
    (C) कल्याणकारी राज्य
    (D) समाजवादी राज्य

46. वुड्रो विल्सन यांच्या मतानुसार लोकप्रशासनाच्या अभ्यासाचा पुढील प्रकारचा संबंध आहे :
    (A) राजकारण व प्रशासन यांची परस्परपूरकता
    (B) राजकारण व प्रशासन यांतील द्वैत
    (C) राजकारणाचे प्रशासनावरील श्रेष्ठत्व
    (D) राजकारणाची प्रशासनाशी दुय्यमता

47. For the following question, mark

(A) if both assertion ($a$) and reason ($r$) are correct and reason ($r$) explains assertion ($a$)

(B) If ($a$) and ($r$) are correct but ($r$) is not correct explanation of ($a$)

(C) If ($a$) is correct and ($r$) is wrong

(D) If both ($a$) and ($r$) are wrong

Assertion (**$a$**): Scientific management upholds standardisation and functionalisation.

Reason (**$r$**): F.W. Taylor believed in participative management.

48. The classical theory of organisation :

(A) believes that human behaviour is not rational

(B) is concerned with formal organisation structure

(C) is concerned with informal organisation structure

(D) is oriented towards human relations

47. खालील प्रश्नासाठी जर विधान ($a$) आणि कारण ($r$) दोन्हीही बरोबर असतील व कारण ($r$) हे विधानाचे स्पष्टीकरण असेल तर (A) हे उत्तर द्या.

विधान ($a$) आणि कारण ($r$) बरोबर असतील पण कारण ($r$) हे ($a$) विधानाचे स्पष्टीकरण नसेल तर (B) हे उत्तर द्या.

जर विधान ($a$) बरोबर पण कारण ($r$) चूक असेल तर (C) हे उत्तर द्या

विधान ($a$) व कारण ($r$) दोन्हीं चूक असतील तर (D) हे उत्तर द्या.

**विधान** (**$a$**) : शास्त्रशुद्ध व्यवस्थापन प्रमाणीकरण (standardisation) व कार्यात्मकता (functionalisation) यांचा पुरस्कार करते.

**कारण** (**$r$**) : एफ्. डब्ल्यू. टेलर यांनी सहभागात्मक व्यवस्थापनाचा पुरस्कार केला.

48. संघटनेच्या अभिजात सिद्धान्त :

(A) मानवी वर्तन तर्कशुद्ध नसते असे म्हणले

(B) औपचारिक संघटनेशी संबंधित आहे

(C) अनौपचारिक संघटनेशी संबंधित आहे

(D) मानवी संबंध अभिमुख आहे

49. New Public Administration underlined :

(A) Efficiency and Economy

(B) Value Neutrality

(C) Management Approach

(D) Social Relevance Approach

50. In which of the following country the Chief Executive is plural ?

(A) England

(B) France

(C) Switzerland

(D) U.S.

51. The ministerial control over administration is maximum in :

(A) Government Company

(B) Government Department

(C) Joint Public Undertakings

(D) Public Corporation

49. नव-लोकप्रशासनाने पुढीलपैकी एक अधोरेखित केले :

(A) कार्यक्षमता व काटकसर

(B) मूल्यतटस्थता

(C) व्यवस्थापन दृष्टिकोन

(D) सामाजिक प्रस्तुतता अधिष्ठित दृष्टिकोन

50. पुढीलपैकी कोणत्या एका देशात कार्यकारी प्रमुख बहुमुखी (plural) आहे ?

(A) इंग्लंड

(B) फ्रान्स

(C) स्वित्सर्लंड

(D) यू.एस्.

51. मंत्र्याचे नियंत्रण पुढीलपैकी एका प्रकारात सर्वाधिक असते :

(A) शासकीय कंपनी

(B) शासकीय खाते

(C) संयुक्त सार्वजनिक उपक्रम

(D) सार्वजनिक महामंडळे

52. For Max Weber, which one of the following is *not* a characteristic of bureaucracy as a form of organisation ?

(A) Selection by merit

(B) Hierarchy of offices

(C) Strict adherance to rules

(D) Public Jobs as personal favour

53. Empowerment of women became one of the important objectives in one of the following Five Year Plans :

(A) Third Five Year Plan

(B) Seventh Five Year Plan

(C) Eighth Five Year Plan

(D) Ninth Five Year Plan

52. मॅक्स वेबर यांच्या मतानुसार पुढीलपैकी कोणते एक नोकरशाहीचे संघटनाचा प्रकार म्हणून वैशिष्ट्य **नाही** ?

(A) पात्रतेनुसार निवड

(B) अधिकारपदाची सोपानरचना

(C) नियमांचे काटेकोर पालन

(D) वैयक्तिक अनुग्रहानुसार सार्वजनिक जागांवर नियुक्ती

53. महिला सबलीकरण हे पुढीलपैकी कोणत्या पंचवार्षिक योजनेचे महत्वाचे उद्दिष्ट होते ?

(A) तिसरी पंचवार्षिक योजना

(B) सातवी पंचवार्षिक योजना

(C) आठवी पंचवार्षिक योजना

(D) नववी पंचवार्षिक योजना

54. Findings of Public Accounts Committee are important because :

(A) These are valuable for future guidance

(B) All members of the committee are experts

(C) These relate to the transactions to be completed

(D) These can prevent current expenditure

55. Distinction between traditional and development administration is that traditional administration :

(A) emphasises regulatory work

(B) has flexible and developing structures

(C) is human relationship oriented

(D) takes initiative and is dynamic

54. सार्वजनिक लेखा समितीचे निष्कर्ष महत्त्वाचे असतात, कारण :

(A) त्यांचा पुढील मार्गदर्शनासाठी उपयोग होतो

(B) त्या समितीतील सर्व सभासद तज्ञ असतात

(C) त्यांचा संबंध पूर्ण करावयाच्या व्यवहारांशी असतो

(D) त्यांच्या मुळे चालू खर्चावर प्रतिबंध करता येतो

55. पारंपरिक व विकास प्रशासन यातील फरक म्हणजे पारंपरिक प्रशासन :

(A) नियामक कार्यावर भर देते

(B) त्याच्या संरचना लवचिक व विकासनात्मक असतात

(C) मानवी संबंध प्रवण असते

(D) ते पुढाकार घेते न गतिशील असते

56. Second Administrative Reforms Commission was appointed by the Central Government in the year :

(A) 1966

(B) 1990

(C) 2005

(D) 2010

57. The theory that "Administration is culture-bound" has been propounded by :

(A) Chester Barnard

(B) F.W. Riggs

(C) F.W. Taylor

(D) Woodrow Wilson

58. Panchayati Raj owes its existence to one of the following Article of the Indian Constitution :

(A) Article 14

(B) Article 15d

(C) Article 31

(D) Article 40

56. केंद्र शासनाने द्वितीय प्रशासन सुधारणा आयोगाची नियुक्ती पुढीलपैकी एका वर्षी केली :

(A) 1966

(B) 1990

(C) 2005

(D) 2010

57. "प्रशासन हे संस्कृतीबद्ध असते" हा सिद्धान्त पुढीलपैकी एकाने मांडला :

(A) चेस्टर बर्नार्ड

(B) एफ्.डब्ल्यू. रिग्ज

(C) एफ्.डब्ल्यू. टेलर

(D) वुड्रो विल्सन

58. पंचायती राज्याचे अस्तित्व भारताच्या राज्यघटनेतील पुढील कलमावर आधारले आहे :

(A) कलम 14

(B) कलम 15d

(C) कलम 31

(D) कलम 40

59. Which of the following statements regarding PPP (Public Private Partnership) is *correct* ?

(1) Private management of public services

(2) Outright sale of public services

(3) PPP does not reduce the responsibility and accountability of government

(4) PPP is public partnership and private projects

(A) (1), (2) and (3) are correct

(B) (2), (3) and (4) are correct

(C) (1), (2) and (4) are correct

(D) (1), (3) and (4) are correct

59. पुढीलपैकी PPP (सार्वजनिक-खाजगी सहभाग) संबंधी पुढीलपैकी कोणते विधान **बरोबर** आहे ?

(1) सार्वजनिक सेवांचे खाजगी व्यवस्थापन

(2) सार्वजनिक सेवांची पूर्ण विक्री

(3) PPP मुळे शासनाची जबावदारी किंवा उत्तरदायित्व कमी होत नाही

(4) PPP म्हणजे सार्वजनिक भागीदारी आणि खाजगी प्रकल्प

(A) (1), (2) व (3) बरोबर आहेत

(B) (2), (3) व (4) बरोबर आहेत

(C) (1), (2) व (4) बरोबर आहेत

(D) (1), (3) व (4) बरोबर आहेत

60. Self-determination means :

(A) Assertion of nationalities to determine what authority will rule them

(B) A decision-making process guided by careful study of situations

(C) A method of decision-making based on having perfect information

(D) A concept derived from Charles Darwin's theory that argues that ruthless competition is ethically acceptable to survive

61. Which one of the following is a process in which a third party participates in negotiations between contending parties ?

(A) Use of good offices

(B) Arbitration

(C) Mediation

(D) Enquiry

60. स्वयंनिर्णय म्हणजे :

(A) कोणती अधिसत्ता आपल्यावर राज्य करणार हे राष्ट्रकांनी ठरवणे

(B) परिस्थितीच्या काळजीपूर्वक केलेल्या अभ्यासाने प्रभावित होणारी धोरण-निर्धारण प्रक्रिया

(C) अचूक माहितीवर आधारित निर्णय घेण्याची पद्धत

(D) अस्तित्व टिकवण्यासाठीची निर्दयी स्पर्धा नैतिकदृष्ट्या मान्य आहे, ही चार्ल्स डार्विनच्या सिद्धांतावर आधारित संकल्पना

61. खालीलपैकी कोणत्या प्रक्रियेत दोन संघर्षग्रस्त पक्षांच्या वाटाघाटींमधे तिसरा पक्ष भाग घेतो ?

(A) आपल्या अधिकाराचा वाटाघाटी सफल होण्यासाठी स्वेच्छेने उपयोग करणे

(B) लवाद

(C) मध्यस्थी

(D) चौकशी

62. The following pair of countries played a leading role in the formation of IOR-ARC (Indian Ocean Region Association for Regional Co-operation) :
    (A) India—Australia
    (B) India—South Africa
    (C) India—Singapore
    (D) India—Mauritius

63. Who claims that "national interest can be determined objectively" ?
    (A) Feminists
    (B) Post-modernists
    (C) Realists
    (D) Liberals

64. Who among the following normally has maximum influence on the making of Indian Foreign Policy ?
    (A) Prime Minister
    (B) Parliament
    (C) Ruling Party
    (D) Foreign Minister

62. देशांच्या खालीलपैकी कोणत्या जोडीने IOR-ARC च्या निर्मितीत महत्त्वाची भूमिका बजावली ?
    (A) भारत—ऑस्ट्रेलिया
    (B) भारत—दक्षिण आफ्रिका
    (C) भारत—सिंगापूर
    (D) भारत—मॉरिशस

63. "राष्ट्रहित वस्तुनिष्ठपणे निर्धारित करता येते" असे कोणाचे म्हणजे आहे ?
    (A) स्त्रीवादी
    (B) उत्तर-आधुनिकवादी
    (C) वास्तववादी
    (D) उदारमतवादी

64. भारताचे परराष्ट्रधोरण ठरवण्याच्या प्रक्रियेवर मुख्यत: कोणाचा सर्वाधिक प्रभाव असतो ?
    (A) पंतप्रधान
    (B) संसद
    (C) सत्ताधारी पक्ष
    (D) परराष्ट्रमंत्री

65. The Realist Theory is based on the premise that :

(A) Application of Reason and Universal Ethics to International Relations can lead to a more orderly world.

(B) World peace and prosperity can created through law, global governance and co-operation among states.

(C) Political integration of states is possible through the creation of Inter-Government Organisations.

(D) World Politics is essentially a struggle among self-interested states for power.

66. End of the Cold War has resulted in :

(A) End of nuclear proliferation

(B) End of inter-state war

(C) End of bipolarity

(D) End of power politics

65. वास्तववादी सिद्धांताचे गृहीतक असे की :

(A) विवेक आणि सार्वत्रिक नीतिमत्ता यांचा उपयोग आंतरराष्ट्रीय संबंधात केल्यास जग अधिक सुसंघटित होईल.

(B) कायदा, जागतिक शासन आणि राज्याराज्यांमधील सहकार्य यांच्याद्वारे जागतिक शांतता आणि संपन्नता प्रस्थापित करता येईल.

(C) आंतरराष्ट्रीय संघटनांच्या माध्यमातून राज्यांचे राजकीय एकात्मीकरण करणे शक्य आहे.

(D) जागतिक राजकारण म्हणजे स्वहिताचे संवर्धन करण्याऱ्या राज्यांमधील संघर्ष होय.

66. शीतयुद्ध संपल्याचा परिणाम :

(A) अण्वस्त्र प्रसारबंदीचा अंत

(B) आंतरदेशीय युद्धांचा अंत

(C) द्विध्रुवीयतेचा अंत

(D) सत्तेच्या राजकारणाचा अंत

67. Match the pairs and select the *correct* answer from the codes given below :

List I

(*a*) Internal rebellion

(*b*) Ethnic conflict

(*c*) Separatism

(*d*) Insurgency

List II

(*i*) The struggle of the LTTE in Sri Lanka

(*ii*) Overthrow of Mubarak regime in Egypt

(*iii*) The NSCN (IM) in Nagaland

(*iv*) Pattani Province in Thailand

*Codes* :

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (C) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |

68. In which of the following countries UN-mandated use of force helped the rebels overthrow the dictator of the country in August, 2011 ?

(A) Tunisia

(B) Egypt

(C) Libya

(D) Syria

67. योग्य जोड्या जुळवा आणि खालील संकेत सूचीतील **अचूक** उत्तरे निवडा :

**सूची** I

(*a*) अंतर्गत बंडाळी

(*b*) वांशिक संघर्ष

(*c*) फुटीरतावाद

(*d*) सशस्त्र उठाव

**सूची** II

(*i*) श्रीलंकेतील एल.टी.टी.ई.चा संघर्ष

(*ii*) इजिप्तमधे मुबारक राजवट उलघवून टाकणे

(*iii*) नागालंडमधे एन.एस.सी.एन. (आय.एम.)

(*iv*) थायळंडमधील पटानी प्रांत

**संकेतसूची :**

| | (*a*) | (*b*) | (*c*) | (*d*) |
|---|---|---|---|---|
| (A) | (*ii*) | (*i*) | (*iv*) | (*iii*) |
| (B) | (*i*) | (*ii*) | (*iii*) | (*iv*) |
| (C) | (*iv*) | (*iii*) | (*ii*) | (*i*) |
| (D) | (*iii*) | (*ii*) | (*i*) | (*iv*) |

68. खालीलपैकी कोणत्या देशात ऑगस्ट, 2011 मधे संयुक्त राष्ट्रांच्या संमतीने केलेल्या बळाच्या वापरामुळे बंडखोरांना त्या देशातील हुकूमशाहीची राजवट उलघवून टाकण्यास मदत झाली ?

(A) ट्युनिशिया

(B) इजिप्त

(C) लिबिया

(D) सीरिया

69. Which of the following statements *correctly* describes India's Policy in Mayanmar ?

(A) India accommodated the ruling military regime while quietly and subtly working for democratic change

(B) India supported the National League for Democracy and denounced the rule of the military regime

(C) India followed a policy of strict "non-interference" in the internal affairs of Myanmar

(D) India always supported the military regime and denounced the democracy movement

70. India-China relations have become far more complex today than in the 1960s, because :

(A) the two countries have become the largest trading partners of each other

(B) the two countries co-operate at multilateral level but continue to have many bilateral disputes

(C) the two countries have embarked upon naval expansion

(D) the two countries have not yet resolved their border dispute

69. खालीलपैकी कोणते विधान म्यानमारविषयीच्या भारताच्या धोरणाचे योग्य वर्णन करते ?

(A) भारताचे एका बाजूला लष्करी राजवटीशी जुळवून घेत असताना दुसऱ्या बाजूने अप्रत्यक्षपणे लोकशाही चळवळीचीही पाठराखण केली

(B) भारताने नॅशनल लीग फॉर डेमॉक्रसीला पाठिंबा दिला आणि लष्करी राजवटीचा धिक्कार केला

(C) म्यानमारच्या अंतर्गत बाबींमधे मुळीच हस्तक्षेप न करण्याचे धोरण भारताने राबवले

(D) भारताने नेहेमीच लष्करी राजवटीला पाठिंबा दिला आणि लोकशाही चळवळीचा निषेध केला

70. 1960 च्या दशकापेक्षा आज भारत-चीन संबंध अधिक गुंतागुंतीचे बनले आहेत, कारण :

(A) हे दोन देश एकमेकांचे सर्वात मोठे व्यापारी भागीदार बनले आहेत

(B) हे दोन देश बहुअक्षीय पातळीवर परस्पर सहकार्य करतात तरीही द्विराष्ट्रीय पातळीवर त्यांच्यात अनेक विवाद आहेत

(C) ह्या दोन देशांनी मोठ्या प्रमाणावर नाविक सामर्थ्य वाढवण्यास सुरुवात केली आहे

(D) ह्या दोन देशांनी त्यांच्यातील सीमा विवाद अघाय सोडवलेला नाही

71. Which of the following regions has declared itself a "Nuclear-Free Zone" ?

(A) South Asia

(B) South-east Asia

(C) East Asia

(D) Central Asia

72. Which of the following is *not* included in the notion of Human Security ?

(A) Economic security

(B) Environmental security

(C) Regime security

(D) Security of the minorities

73. How can you best describe India's Nuclear Programme ?

(A) Military

(B) Dual Track

(C) Civilian

(D) Technological

71. खालीलपैकी कोणत्या क्षेत्राने स्वत:ला "अण्वस्त्रमुक्त क्षेत्र" म्हणून घोषित केले आहे ?

(A) दक्षिण आशिया

(B) आग्नेय आशिया

(C) पूर्व आशिया

(D) मध्य आशिया

72. मानवी सुरक्षेच्या संकल्पनेत खालीलपैकी कोणत्या बाबीचा समावेश होत **नाही** ?

(A) आर्थिक सुरक्षा

(B) पर्यावरणीय सुरक्षा

(C) राजवटीची सुरक्षा

(D) अल्पसंख्याकांची सुरक्षा

73. भारताच्या आण्विक कार्यक्रमाचे योग्य वर्णन कसे कराल ?

(A) लष्करी

(B) द्विमार्गी

(C) नागरी

(D) तंत्रज्ञानात्मक

74. What does the principle of Most Favoured Nation (MFN) in WTO mean ?

(A) Lower trade barriers for MFN than other countries

(B) Higher trade barriers for MFN than other countries

(C) Trade barriers applied to MFN must be applied to all others

(D) Removal of all trade barriers for the MFN

75. Which among the following political parties have been opposing Women's Reservation Bill ?

(A) Congress, CPI, CPM

(B) RJD, Samajwadi Party, BSP

(C) BJP, RJD, Akali Dal

(D) TDP, NCP, Samajwadi Party

74. जागतिक व्यापार संघटनेतील 'सर्वाधिक पसंतीचे राष्ट्र' (MFN) या तत्त्वाचा अर्थ काय ?

(A) इतर राष्ट्रांपेक्षा MFN साठी व्यापारातील अडथळे कमी असतात

(B) इतर राष्ट्रांपेक्षा MFN साठी व्यापारातील अडथळे अधिक असतात

(C) MFN साठी व्यापारातील जेवढे अडथळे असतील तेवढेच इतर सर्व राष्ट्रांना लागू करावे लागतात

(D) MFN साठी व्यापारातील सर्व अडथळे काढून टाकलेले असतात

75. खालीलपैकी कोणते राजकीय पक्ष स्त्रियांना आरक्षण देणाऱ्या विधेयकाला विरोध करता आहेत ?

(A) काँग्रेस, भारतीय कम्युनिस्ट पक्ष, मार्क्सवादी कम्युनिष्ट पक्ष

(B) राष्ट्रीय जनता दल, समाजवादी पक्ष, बहुजन समाज पक्ष

(C) भारतीय जनता पक्ष, राष्ट्रीय जनता दल, अकाली दल

(D) तेलगूदेशम पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष, समाजवादी पक्ष

ROUGH WORK

Test Booklet No.
प्रश्नपत्रिका क्र.

**M**

# Paper-III
# POLITICAL SCIENCE

**Signature and Name of Invigilator**

1. (Signature) ........................................

(Name) ................................................

2. (Signature) ........................................

(Name) ................................................

Seat No. | | | | | | |

(In figures as in Admit Card)

Seat No. ...........................................................

(In words)

OMR Sheet No. | | | | | | |

(To be filled by the Candidate)

# FEB - 15313

**Time Allowed : 2½ Hours]** **[Maximum Marks : 150**

Number of Pages in this Booklet : **40** Number of Questions in this Booklet : **75**

**Instructions for the Candidates**

1. Write your Seat No. and OMR Sheet No. in the space provided on the top of this page.
2. This paper consists of **75** objective type questions. Each question will carry *two* marks. *All* questions of Paper-III will be compulsory, covering entire syllabus (including all electives, without options).
3. At the commencement of examination, the question booklet will be given to the student. In the first 5 minutes, you are requested to open the booklet and compulsorily examine it as follows :
   (*i*) To have access to the Question Booklet, tear off the paper seal on the edge of this cover page. Do not accept a booklet without sticker-seal or open booklet.
   (*ii*) **Tally the number of pages and number of questions in the booklet with the information printed on the cover page. Faulty booklets due to missing pages/questions or questions repeated or not in serial order or any other discrepancy should not be accepted and correct booklet should be obtained from the invigilator within the period of 5 minutes. Afterwards, neither the Question Booklet will be replaced nor any extra time will be given. The same may please be noted.**
   (*iii*) After this verification is over, the OMR Sheet Number should be entered on this Test Booklet.
4. Each question has four alternative responses marked (A), (B), (C) and (D). You have to darken the circle as indicated below on the correct response against each item.
   **Example :** where (C) is the correct response.
   (A) (B) ● (D)
5. Your responses to the items are to be indicated in the **OMR Sheet given inside the Booklet only.** If you mark at any place other than in the circle in the OMR Sheet, it will not be evaluated.
6. Read instructions given inside carefully.
7. Rough Work is to be done at the end of this booklet.
8. If you write your Name, Seat Number, Phone Number or put any mark on any part of the OMR Sheet, except for the space allotted for the relevant entries, which may disclose your identity, or use abusive language or employ any other unfair means, you will render yourself liable to disqualification.
9. You have to return original OMR Sheet to the invigilator at the end of the examination compulsorily and must not carry it with you outside the Examination Hall. You are, however, allowed to carry the Test Booklet and duplicate copy of OMR Sheet on conclusion of examination.
10. **Use only Blue/Black Ball point pen.**
11. **Use of any calculator or log table, etc., is prohibited.**
12. **There is no negative marking for incorrect answers.**

**विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाच्या सूचना**

1. परिक्षार्थींनी आपला आसन क्रमांक या पृष्ठावरील वरच्या कोपऱ्यात लिहावा. तसेच आपणांस दिलेल्या उत्तरपत्रिकेचा क्रमांक त्याखाली लिहावा.
2. सदर प्रश्नपत्रिकेत **75** बहुपर्यायी प्रश्न आहेत. प्रत्येक प्रश्नास **दोन** गुण आहेत. या प्रश्नपत्रिकेतील **सर्व** प्रश्न सोडविणे अनिवार्य आहे. सदरचे प्रश्न हे या विषयाच्या संपूर्ण अभ्यासक्रमावर आधारित आहेत.
3. परीक्षा सुरू झाल्यावर विद्यार्थ्याला प्रश्नपत्रिका दिली जाईल. सुरुवातीच्या 5 मिनीटांमध्ये आपण सदर प्रश्नपत्रिका उघडून खालील बाबी आवश्य तपासून पहाव्यात.
   (*i*) प्रश्नपत्रिका उघडण्यासाठी प्रश्नपत्रिकेवर लावलेले सील उघडावे. सील नसलेली किंवा सील उघडलेली प्रश्नपत्रिका स्विकारू नये.
   (*ii*) **पहिल्या पृष्ठावर नमूद केल्याप्रमाणे प्रश्नपत्रिकेची एकूण पृष्ठे तसेच प्रश्नपत्रिकेतील एकूण प्रश्नांची संख्या पडताळून पहावी. पृष्ठे कमी असलेली/कमी प्रश्न असलेली/प्रश्नांचा चूकीचा क्रम असलेली किंवा इतर त्रुटी असलेली सदोष प्रश्नपत्रिका सुरुवातीच्या 5 मिनिटातच पर्यवेक्षकाला परत देऊन दुसरी प्रश्नपत्रिका मागवून घ्यावी. त्यानंतर प्रश्नपत्रिका बदलून मिळणार नाही तसेच वेळही वाढवून मिळणार नाही याची कृपया विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.**
   (*iii*) वरीलप्रमाणे सर्व पडताळून पहिल्यानंतरच प्रश्नपत्रिकेवर ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेचा नंबर लिहावा.
4. प्रत्येक प्रश्नासाठी (A), (B), (C) आणि (D) अशी चार विकल्प उत्तरे दिली आहेत. त्यातील योग्य उत्तराचा रकाना खाली दर्शविल्याप्रमाणे ठळकपणे काळा/निळा करावा.
   **उदा. :** जर (C) हे योग्य उत्तर असेल तर.
   (A) (B) ● (D)
5. या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांची उत्तरे **ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेतच दर्शवावीत.** इतर ठिकाणी लिहीलेली उत्तरे तपासली जाणार नाहीत.
6. आत दिलेल्या सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात.
7. प्रश्नपत्रिकेच्या शेवटी जोडलेल्या कोऱ्या पानावरच कच्चे काम करावे.
8. जर आपण ओ.एम.आर. वर नमूद केलेल्या ठिकाणा व्यतिरीक्त इतर कोठेही नाव, आसन क्रमांक, फोन नंबर किंवा ओळख पटेल अशी कोणतीही खूण केलेली आढळून आल्यास अथवा असभ्य भाषेचा वापर किंवा इतर गैरमार्गांचा अवलंब केल्यास विद्यार्थ्याला परीक्षेस अपात्र ठरविण्यात येईल.
9. परीक्षा संपल्यानंतर विद्यार्थ्याने मूळ ओ.एम.आर. उत्तरपत्रिका पर्यवेक्षकांकडे परत करणे आवश्यक आहे. तथापी, प्रश्नपत्रिका व ओ.एम.आर. उत्तरपत्रिकेची द्वितीय प्रत आपल्याबरोबर नेण्यास विद्यार्थ्यांना परवानगी आहे.
10. **फक्त निळ्या किंवा काळ्या बॉल पेनचाच वापर करावा.**
11. **कॅलक्युलेटर किंवा लॉग टेबल वापरण्यास परवानगी नाही.**
12. **चुकीच्या उत्तरासाठी गुण कपात केली जाणार नाही.**